# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
## ( निवडणूक शाखा )

| | |
|---|---|
| वेबसाईट : www.nwcmc.gov.in | जा.क्र. नांवाशमनपा/निवड/ 04 /2017 |
| ई-मेल : info@nwcmc.gov.in, election@nwcmc.gov.in | दिनांक : 18/7/2017 |
| दुरध्वनी क्र. 02462-233625, 234405, 235710 | फॅक्स क्र. 02462-232071 |


निवडणुक प्राधान्य/महत्वाचे

## आदेश

विषय : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक - 2017
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपुर्वी लोकप्रतिनिधींना स्वेच्छा निधीतुन खर्च करण्यावर निर्बंध

संदर्भ : मा. राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र, यांचे आदेश क्रं. रानिआ-2016 /लोस्वेनि/प्र.क्र.-12/संक दिनांक 05 ऑक्टोंबर 2016

ज्या अर्थी देशाच्या, राज्यांच्या, व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च केला जातो. या शिवाय, निवडुन आलेल्या प्रतिनीधींना स्थानिक स्तरावर सामाजीक कांमांवर खर्च करण्यासाठी काही स्वेच्छा निधी (Discretionary Grant) उपलब्ध करुन दिला जातो,आणि

ज्या अर्थी, निवडणुकांपुर्वी काही लोकप्रतिनीधी स्वेच्छा निधी मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने, खर्च करतात ही बाब लक्षात घेता मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्रमांक 1632 / 1967 घासीराम विरुध्द दालसिंग व इतर प्रकरणांमध्ये अभिप्राय नोंदविले आहेत,आणि

ज्या अर्थी, भारत सरकारच्या दिनांक 28.08.1969 च्या मार्गदर्शक सुचना व त्यावर मा. उच्च न्यायालय, पंजाब व हरीयाणा यांनी श्री हरबससिंग जलाल यांच्या प्रकरणी दिलेले आदेश लक्षात घेता सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये लोकप्रतिनिधी द्वारे स्वेच्छा निधी मधील करण्यात येणाऱ्या खर्चांवर निर्बंध घालणे आवश्यक आहे,आणि

ज्या अर्थी, संदर्भीय आदेशानुसार कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीमध्ये संबधीत स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्याच्या 3 महीने आधी पासुन किंवा निवडणुक कार्यक्रम जाहीर केल्यापासुन यापैकी जे आगोदर घडेल त्या दिनांकापासुन कोणत्याही लोक प्रतिनीधींना त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील कामांवर स्वेच्छा निधीतुन खर्च करता येणार नाही, आणि

ज्या अर्थी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड ची मुदत दिनांक 31 ऑक्टोंबर 2017 रोजी संपत आहे,
ज्या अर्थी, सदर निर्बंध लागु होतील या बाबतचे आदेश काढण्यास महानगरपालिका आयुक्त सक्षम आहेत.

त्या अर्थी, मी, **गणेश देशमुख, आयुक्त तथा निवडणुक अधिकारी**, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सार्वत्रिक निवडणुक 2017, या सर्व बाबींचा विचार करुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सार्वत्रिक निवडणुक 2017 निर्भय, मुक्त व पारदर्शक होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१- दिनांक 31 जुलै 2017 नंतर कोणत्याही लोक प्रतिनिधींनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड च्या हद्दीत स्वेच्छा निधीतुन कोणत्याही प्रकारच्या कामाचे आश्वासन देवु नये किंवा मंजुरीसाठी नव्याने प्रस्ताव संबधीत अधिका-याकडे सादर करु नयेत.

२- स्वेच्छा निधीतुन काम मंजुर करणा-या, कार्यारंभ आदेश देणा-या किंवा प्रत्यक्ष काम करणाऱ्या अधिकारी यांनी खालील बाबींचे कटाक्षाने पालन करावे.

- दिनांक 31 जुलै 2017 नंतर कोणत्याही नविन कामाच्या प्रस्तावास मंजुरी देवु नये.
- दिनांक 31 जुलै 2017 पुर्वी प्रस्ताव मंजुर असेल, पण प्रत्यक्षात कामास सुरुवात झाली नसेल तर दिनांक 31 जुलै 2017 नंतर कार्यारंभ आदेश देवु नये किंवा कामांस सुरुवात करु नये.

---पान नं.०२ वर--

- दिनांक 31 जुलै 2017 पुर्वी जर प्रत्यक्ष कामाची सुरुवात झाली असेल तर ती कामे सुरु ठेवावीत.

5. सदरचा आदेश हा सर्व लोकप्रतिनिधी (मा.मंत्री व मा.राज्य मंत्री यासह) यांना लागु राहील.
6. वरील निर्बंध न पाळल्यास ते काम मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचे गृहीत धरण्यात येवुन त्या कामास त्वरीत स्थगिती देण्यात येईल, व सबंधीत अधिका-या विरुध्द **लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1951 व अनुषंगीक नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.**

(गणेश देशमुख)
आयुक्त तथा निवडणुक अधिकारी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत :-

1.. मा. महापौर, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
2. मा. उप महापौर, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
3. मा. विरोधी पक्षनेता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
4. मा. सभापती, स्थायी समिती, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
5. मा. सभागृह नेता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
6. सभापती / उप सभापती महीला व शिक्षण बाल कल्याण समिती,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
7. सर्व गटनेते ,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
8. सर्व सदस्य, ,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
9. सर्व उपआयुक्त, ,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
10. सर्व विभाग प्रमुख, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड